नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १६४ Issue - 164 | वार सोमवार दि. ३ नोव्हेंबर २०२५ Blow- Monday Date 3 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे पांडुरंगाला साकडं!

## राज्यातील शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे



- ■ दर्शन मंडपाचे काम जलद गतीने करून भाविकांना कमी वेळेत दर्शनाची सुविधा द्यावी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे
- ■ कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांना उत्कृष्ट सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात प्रशासन यशस्वी, यावर्षीच्या कार्तिकी वारीला अतिरिक्त पाच कोटीचा निधी उपलब्ध करून देण्यात आला
- ■ श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व एमटीडीसी यांच्यातील जागेबाबतच करारनामा ३० वर्षापर्यंत करण्यास उपमुख्यमंत्र्यांची मान्यता, तर सर्वे नंबर १६१ मधील जागेबाबतचा प्रस्ताव पुढील महिन्यात पाठवावा
- ■ नांदेड जिल्ह्याच्या हिमायतनगर तालुका येथील पोटा गावचे वारकरी श्री. रामराव बसाजी वालेगावकर व सौ. सुशिलाबाई रामराव वालेगावकर यांना शासकीय महापूजेचा मान
- ■ मानाचे वारकऱ्यांना एसटीचा मोफत पास एक वर्षा ऐवजी कायम स्वरूपी देण्याची उपमुख्यमंत्री यांची घोषणा
- ■ यावर्षीपासून प्रथमच शालेय विद्यार्थी कु. मानसी आनंद माळी व चि. आर्य समाधान थोरात यांची विद्यार्थी मानकरी म्हणून निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी भाविकांना कमी वेळ लागावा तसेच दर्शन रांगेमध्ये पाणी, बैठक व्यवस्था यासह सर्व प्रकारच्या सुविधा मिळाव्या याकरिता तिरुपतीच्या धर्तीवर दर्शन मंडप निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने १३० कोटीचा निधी मंजूर केलेला होता. या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून प्रशासनाने हे काम अत्यंत जलद गतीने पूर्ण करून भाविकांना दर्शनाची सुविधा सुलभ व कमी वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

कार्तिकी यात्रा २०२५च्या अनुषंगाने श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी रामराव वालेगावकर यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आलेल्या सत्कार प्रसंगी श्री. एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, खासदार श्रीकांत शिंदे, आमदार सर्वश्री समाधान आवताडे, अभिजीत पाटील, तानाजी सावंत, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व समिती सदस्य तसेच समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, पंढरपूर येथे आषाढी व कार्तिकी वारीमध्ये लाखो भाविक श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. भाविकांना दर्शन रांगेत चांगल्या सुविधा मिळण्याबरोबरच कमी वेळेत दर्शन होण्यासाठी दर्शन मंडप काम गतीने होणे गरजेचे आहे यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी. श्री विठ्ठल रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन बंद केलेले असून वारकऱ्यांना लवकर दर्शन मिळत आहे. कारण वारकरी हाच व्हीआयपी असल्याचे त्यांनी सांगून वारकऱ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाने चांगले नियोजन केल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यातील शेतकऱ्यावर मोठे संकट आलेले आहे. शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे खूप मोठे नुकसान झालेले आहे. अशा संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांना तातडीची मदत म्हणून शासनाने ३२ हजार कोटीचे पॅकेज जाहीर केलेले आहे. तसेच शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासाठी समितीची स्थापना केल्याची माहिती उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली. बळीराजावर आलेले अरिष्ट दूर कर, त्यांना सुख व समाधानाचे दिवस येऊ दे, असे साकडं पांडुरंगाला घातले असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

राज्य परिवहन महामंडळ मार्फत मानाच्या वारकऱ्यांना वर्षभर एसटीने प्रवास करण्यासाठी मोफत पास दिला जातो. यापुढील काळात या वारकऱ्यांना कायमस्वरूपी एसटीचा मोफत पास देण्यात येणार आहे. तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडे असलेली महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास मंडळाची जागा आणखी पुढे तीस वर्ष राहील असा करार लवकरच करण्यात येणार आहे. तसेच सर्वे नंबर १६१ मधील जागा मंदिर समितीला देण्याबाबतचा प्रस्ताव पुढील महिन्यात नगर विकास विभागाला सादर करावा, याबाबतचाही निर्णय तात्काळ घेण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली.

(पान २ वर....)

# भरधाव वेगात बसची ट्रेलरला धडक; १८ भाविकांचा जागीच मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जयपूर: राजस्थानमधील जोधपुर जिल्ह्यात एक अत्यंत दुर्दैवी रस्ता अपघात झाला आहे. फलोदी तालुक्यात हा अपघात घडला असून, एका टेम्पो ट्रॅव्हलरची ट्रेलरला जोरदार धडक दिली. या धडकेमुळे टेम्पो ट्रॅव्हलरचे अक्षरशः तुकडे झाले आणि त्यात अडकलेल्या अनेक प्रवाशांना गंभीर दुखापत झाली. बसचालकाने रस्त्याच्या कडेला उभा असलेला ट्रेलर पाहिला नाही आणि या चुकीमुळे अपघात झाला असल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात १८ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर अनेक जण जखमी झाले आहेत. बचावकार्य अजूनही सुरू असून, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाविकांची ही बस जोधपुरच्या सूरसागर भागातून बीकानेर जिल्ह्यातील कोलायत तीर्थक्षेत्री दर्शनासाठी गेली होती. दर्शनानंतर परत येत असताना, मतोडाजवळ रस्त्यावर उभ्या असलेल्या एका ट्रेलरला बस धडकली. बसमधील बहुतांश प्रवासी दर्शन घेऊन आपल्या घरी परत जात होते. अचानक झालेल्या या भीषण अपघाताने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. या अपघातात आतापर्यंत १८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ३ ते ४ प्रवासी जखमी आहेत. मृतांमध्ये महिला आणि लहान मुलांचाही समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे. जखमी झालेल्या भाविकांना तातडीने प्राथमिक उपचार देऊन जोधपुरमधील एसएमएस आणि एमडीएम रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. प्रशासनाने मृतदेह शवविच्छेदनासाठी फलोदी रुग्णालयात पाठवले आहेत.

मतोडा पोलीस ठाण्याचे अधिकारी यांनी सांगितले की, बस भरधाव वेगात असताना रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रेलरला धडकली. घटनास्थळी पोलीस, स्थानिक प्रशासन आणि रुग्णवाहिका टीम दाखल झाल्या आणि त्यांनी तात्काळ बचावकार्य सुरू केले. गॅस कटरच्या मदतीने बसमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यात आले.

या अत्यंत दुःखद घटनेमुळे संपूर्ण जोधपुर आणि आसपासच्या परिसरात शोककळा पसरली आहे. अपघाताची गंभीरता लक्षात घेता, प्रशासनाने या अपघाताच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे रस्त्यावर उभे असलेल्या अवजड वाहनांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# उसाला पहिली उचल 3 हजार ७५१ रुपयेच घेणार : राजू शेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कोल्हापूर : कोल्हापूर व सांगली जिल्ह्याबरोबर कर्नाटक सीमाभागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ३ हजार ७५१ रुपयांची पहिली उचल मिळवून देवू यासाठी आंदोलनाची तीव्रता अजून वाढवण्याची आर्त हाक स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी दिली आहे. आज गुरलापूर जिल्हा बेळगांव येथे झालेल्या ऊस आंदोलनात राजू शेट्टी बोलत होते. गेल्या आठवड्यापासून महाराष्ट्रापेक्षाही कर्नाटक सीमाभागात आंदोलनाची तीव्रता वाढली आहे. यामुळे चालू वर्षी गळीत हंगामात पहिली उचल ३ हजार ७५१ रुपये व गत हंगामातील तुटलेल्या ऊसाला २०० रूपये दुसरा हप्ता घेतल्याशिवाय कारखाने सुरू न करण्याचा निर्धार कर्नाटक सीमाभागातील बेळगांव व बागलकोट जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतक-यांनी गुरलापूर जि. बेळगांव येथे सुरू असलेल्या आंदोलना दरम्यान केला आहे.


कोल्हापूर , सांगली व कर्नाटक सीमभागातील साखर कारखानदार मोठ्या प्रमाणात काटामारी व रिकव्हरी चोरी करत आहेत. सर्व कारखानदार एक होवून कोल्हापुर जिल्ह्यासाठी ३४०० रूपये व कर्नाटक राज्यातील बेळगांव व बागलकोट जिल्ह्यातील कारखाने ३ हजार रूपये पहिली उचल देण्यावर ठाम राहिले आहेत. मात्र ऊस उत्पादक शेतक-यांनी अभूतपुर्व एकी केली असून साखर कारखान्यांची ऊस वाहतूक रोखून धरली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखानदार कर्नाटकातील ८० ते ९० किलोमीटर अंतरावरून ऊस आणण्याचा प्रयत्न करत असून ९० किलोमीटर वरून येणाऱ्या ऊसाला ३४०० रूपये दर देण्याची घोषणा जवाहर साखर कारखान्यांने केली आहे. यामुळे साखर कारखान्यास प्रतिटन जवळपास ११०० रूपये तोडणी वाहतूकीचा दर पडणार आहे. यामुळे स्वाभिमानीने प्रतिटन ३७५१ रूपयाची पहिली उचलची मागणी योग्य असल्याचे यावरून स्पष्ट झाले असल्याची माहिती राजू शेट्टी यांनी दिली.

कारखानदार जाहीर करत असलेला ३ हजार ४०० रुपयांचा दर मान्य नाही. तर उसाला ३ हजार ७५१ रुपयांचा दर द्यावा. सोमवारपर्यंत जिल्हा प्रशासनाने कारखानदार आणि संघटनांची बैठक घेऊन तोडगा काढावा अशी मागणी राजू शेट्टींनी केली आहे. सोमवारी ही बैठक न झाल्यास बुधवारी कोल्हापूर दौऱ्यावर येत असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे उसाचा बुडखा देऊन स्वागत करु असा इशाराच या वेळेस राजू शेट्टी यांनी दिला आहे.

# इस्त्रोच्या 'बाहुबली' रॉकेटची कमाल, नेव्हीचे सॅटेलाईट ठेवणार पाकिस्तान-चीनवर करडी नजर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



श्रीहरीकोटा : आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन स्पेस सेंटर मधून भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोने २ नोव्हेंबर रोजी ४,४१० किलोग्रॅम वजनाचा CMS-03 हा उपग्रह यशस्वीरीत्या प्रक्षेपित केला. हा उपग्रह भारतीय नौदलाचा आतापर्यंतचा सर्वात प्रगत कम्युनिकेशन सॅटेलाइट ठरला आहे.

CMS-03 सॅटेलाइटचे प्रक्षेपण LVM3-M5 रॉकेट (Launch Vehicle Mark-3) द्वारे करण्यात आले. या रॉकेटला त्याच्या प्रचंड वहन क्षमतेमुळे 'बाहुबली रॉकेट' म्हणून ओळखले जाते. हे रॉकेट भारतातून भू-समकालिक स्थानांतरण कक्षेत (Geo-synchronous Transfer Orbit GTO) सोडण्यात आलेले आतापर्यंतचे सर्वात अवजड सॅटेलाइट आहे.

खडठज ने सोशल मीडियावर दिलेल्या माहितीनुसार, LVM3-M5 च्या प्रक्षेपणाची उलटी गणना शनिवारी सायं ५ वाजून २६ मिनिटांनी सुरू झाली होती आणि ती सुरळीतपणे पार पडली. हे प्रक्षेपण रविवारी सायं ५ वाजून २६ मिनिटांनी यशस्वीरीत्या पूर्ण झाले.

CMS-03 सॅटेलाइट पूर्णतः भारतातच डिझाइन आणि निर्मित करण्यात आलं आहे. यामुळे नौदलाच्या जहाजांमध्ये, विमानांमध्ये, पाणबुड्यांमध्ये आणि समुद्री ऑपरेशन्स सेंटर्समध्ये सुरक्षित आणि वेगवान कम्युनिकेशन शक्य होणार आहे. हे सॅटेलाइट समुद्रात शत्रूंच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात मदत करेल, तसेच नौदलाच्या संरक्षण क्षमतेला मोठी गती देईल.

डतच३-च५ हे तीन टप्प्यांमध्ये कार्यरत अत्याधुनिक रॉकेट आहे,

१. दोन सॉलिड मोटर स्ट्रॅप-ऑन्स (S200)


२. द्रव प्रणोदक कोर स्टेज (L110)

३. क्रायोजेनिक स्टेज (C25)

या तंत्रज्ञानामुळे इस्त्रो आता ४,००० किलोपर्यंत वजनाचे सॅटेलाइट्स स्वतःच्या तंत्रज्ञानाद्वारे जीटीओ कक्षेत पाठवू शकते. म्हणजेच भारत आता या क्षेत्रात पूर्णतः आत्मनिर्भर झाला आहे.

ISRO ने सांगितले की LVM3-M5 ही 'पाचवी ऑपरेशनल फ्लाइट' असून, भारताच्या अंतराळ मोहिमांमध्ये एक महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला आहे.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.
फक्त आमच्या कडेच



मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### ऐतिहासिक विजय

भारतीय महिला संघाने २०२५ च्या महिला विश्वचषकाचं विजेतेपद पटकावून इतिहास रचला आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने आपला पहिला आयसीसी किताब जिंकत देशाला अभिमान वाटावा अशी कामगिरी केली आहे. रविवारी, २ नोव्हेंबर रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी पराभूत करत विश्वविजेतेपदावर नाव कोरलं. या ऐतिहासिक विजयावर भारतीय क्रिकेटमधील दिग्गज सचिन तेंडुलकरपासून ते वीरेंद्र सेहवाग आणि विराट कोहलीपर्यंत सर्वांनी संघाचे अभिनंदन केले. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनीही भारतीय महिला संघाचे कौतुक करत विशेष पोस्ट शेअर केली. सचिन तेंडुलकर यांनी लिहिलं की, १९८३ च्या विजयाने अनेक पिढ्यांना मोठं स्वप्न बघण्याची आणि ते पूर्ण करण्याची प्रेरणा दिली. आज आपल्या महिला क्रिकेट संघाने तसंच काहीतरी विशेष केलं आहे. त्यांनी देशभरातील असंख्य मुलींना बॅट आणि बॉल हाती घेऊन मैदानात उतरायला आणि स्वतःवर विश्वास ठेवायला प्रेरित केलं आहे. अनिल कुंबळे यांनी लिहिलं, सुरुवातीपासून शेवटपर्यंत अप्रतिम कामगिरी. शिस्तबद्ध, निडर आणि एकजूट असलेली. हा विजय संघाच्या सातत्य आणि दबावाखाली शांत राहण्याच्या क्षमतेचं प्रतीक आहे. दक्षिण आफ्रिकेलाही श्रेय द्यायलाच हवं, त्यांनीही संपूर्ण दमदार खेळ केला आणि अंतिम सामना खऱ्या चॅम्पियन्ससारखा बनवला. वीरेंद्र सेहवाग याने एक्सवर लिहिलं की, चॅम्पियन्स! प्रत्येक चौकार, प्रत्येक विकेट आणि त्यांच्या जिद्दीने संपूर्ण देशाचं हृदय जिंकलं. आपल्या विश्वविजेत्या मुलींचा आम्हाला अभिमान आहे. हरमनप्रीत आणि तिच्या संघाने संपूर्ण पिढीला जिंकण्याचं, लढण्याचं स्वप्न दिलं आहे. भारतीय महिला संघाला विश्वचषक विजयाबद्दल मनःपूर्वक शुभेच्छा. जबरदस्त खेळ. दीप्ती शर्मा, तुम्ही अप्रतिम आहात. शेफाली, शाब्बास!

# एक आरोग्य : मानव, प्राणी आणि पर्यावरणाच्या सुसंवादातून शाश्वत आरोग्याचा समाजशास्त्रीय मार्ग : डॉ. राजेंद्र बगाटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

०३ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी 'एक आरोग्य दिन' (जपश क्शरश्रींह ऊू) म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे महत्त्व केवळ वैद्यकीय परिघात मर्यादित नाही, तर तो सामाजिक, पर्यावरणीय आणि नैतिक जबाबदारीचा जागरूक संदेश देतो. आजच्या जगात माणसाचे आरोग्य हे स्वतंत्रपणे समजून घेणे अशक्य झाले आहे. कारण मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे जीवन परस्परांशी घट्ट गुंतलेले आहे. 'एक आरोग्य' ही संकल्पना याच परस्परसंबंधाचा विचार करून सांगते की पृथ्वीवरील सर्व सजीव आणि त्यांच्या परिसरातील नातेसंबंध हे आरोग्याच्या मूळ गाभ्याशी निगडित आहेत. म्हणजेच मानवाचे आरोग्य प्राण्यांच्या आणि पर्यावरणाच्या आरोग्याशी अविभाज्य आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता ही संकल्पना केवळ वैद्यकीय नव्हे तर सामाजिक रचना, संस्कृती, अर्थव्यवस्था, पर्यावरणीय नीती आणि मानवी वर्तन यांचा समग्र आरसा बनते.

'एक आरोग्य' (जपश क्शरश्रींह) ही संकल्पना जागतिक आरोग्य संघटना (थकज), जागतिक प्राणी आरोग्य संघटना (थजक), संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटना (ऋज) आणि संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (णछएझ) यांनी संयुक्तपणे विकसित केली आहे. या तत्त्वानुसार मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे आरोग्य एकमेकांवर अवलंबून आहे, आणि कोणत्याही घटकातील असमतोल संपूर्ण जगाच्या आरोग्यसाखळीला धोक्यात आणतो. याचे अत्यंत ठळक उदाहरण म्हणजे 'कोविड-१९' महामारी, जी प्राण्यांकडून मानवाकडे पसरलेल्या झूनोटिक रोगाचे द्योतक ठरली. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, सुमारे ६० टक्क्यांहून अधिक संसर्गजन्य रोग हे प्राण्यांकडून मानवाकडे पसरणारे म्हणजेच झूनोटिक रोग आहेत. समाजशास्त्रीय विश्लेषणात हे दिसते की या रोगांचा प्रसार केवळ जैविक कारणांमुळे नसून, मानवी वर्तन, पर्यावरणाचा नाश, जंगलतोड, औद्योगिकीकरण, शहरीकरण, आणि प्राण्यांच्या अधिवासात मानवी हस्तक्षेप यांमुळेही होतो.

आजच्या काळात आरोग्याच्या प्रश्नांकडे समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर अनेक परस्पर-संबंध उलगडतात. समाजशास्त्र सांगते की आरोग्य हे केवळ आजार नसण्याची स्थिती नाही, तर शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि पर्यावरणीय संतुलनाची अवस्था आहे. ही अवस्था समाजातील मूल्यव्यवस्था, आर्थिक परिस्थिती, शिक्षण, लिंगसमानता, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक आचारांवर अवलंबून असते. उदा. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि पोषणाची कमतरता ही केवळ वैद्यकीय समस्या नसून ती सामाजिक असमानतेचे प्रतिबिंब आहे. त्याचप्रमाणे शहरी भागातील प्रदूषण, ध्वनीकल्लोळ, आणि मानसिक ताणतणाव हे आधुनिक जीवनपद्धतीचे उपउत्पादन आहेत. त्यामुळे 'एक आरोग्य'ची कल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्याला सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीच्या चौकटीत बसवते.

भारतीय परंपरेतही 'एक आरोग्य'सदृश विचारांचे दर्शन होते. प्राचीन ग्रंथांमध्येही मानव आणि निसर्गाच्या सुसंवादाला सर्वोच्च स्थान दिले गेले आहे. मानवाचे आरोग्य आणि विश्वाचे संतुलन एकसंध मानले गेले आहे. वसुधैव कुटुंबकम्‌ ही संकल्पना पृथ्वीवरील सर्व सजीव एकाच कुटुंबाचे घटक असल्याचा संदेश देते. परंतु औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या अतिरेकामुळे मानवाने निसर्गाच्या सहजीवनाची ही मूल्यव्यवस्था विसरली आहे. परिणामतः पर्यावरणीय ऱ्हास, जलवायू बदल, हवामानातील अस्थिरता, अन्नसाखळीतील विषारी रासायनिक हस्तक्षेप, तसेच प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाचा नाश या सर्वांनी मानवाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम केला आहे.

'एक आरोग्य' दृष्टीकोन समाजात शाश्वत आणि न्याय्य आरोग्यव्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय ठेवतो. तो आरोग्याचा प्रश्न केवळ डॉक्टर-रुग्ण संबंधात मर्यादित न ठेवता, शासन, शिक्षण, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि नागरिक जबाबदारी या सर्व क्षेत्रांत पसरवतो. समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार आरोग्यविषयक असमानता ही सामाजिक विषमतेशी थेट संबंधित आहे. गरीब, महिला, आदिवासी, स्थलांतरित मजूर आणि ग्रामीण समाजातील दुर्बल घटक हे आरोग्य संकटांचे सर्वाधिक बळी ठरतात. त्यांना स्वच्छ पाणी, पोषण, आणि आरोग्यसेवा मिळविण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक अडथळ्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे 'एक आरोग्य' ही संकल्पना सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची ठरते.

पर्यावरणीय असंतुलन हा आरोग्याचा सर्वात मोठा सामाजिक धोका बनला आहे. वृक्षतोड, प्लास्टिक संस्कृती, रासायनिक शेती, प्रदूषण आणि औद्योगिक कचरा यांमुळे माती, पाणी आणि हवा दूषित झाली आहे. या प्रदूषणामुळे श्वसनाचे विकार, त्वचारोग, कर्करोग, अन्नातील विषारी घटक, तसेच मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे घटक वाढले आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोन सांगतो की हे केवळ पर्यावरणीय नव्हे तर आर्थिक आणि नैतिक प्रश्न आहेत, कारण या परिस्थितीचा सर्वाधिक फटका दुर्बल वर्गांना बसतो. 'एक आरोग्य' या दृष्टीकोनातून समाजाला पर्यावरणीय न्यायाची नवी संकल्पना मिळते, जिथे प्रत्येक व्यक्तीला निरोगी वातावरणात जगण्याचा अधिकार मिळतो.

ग्रामीण भारतात अजूनही आरोग्य आणि पशुवैद्यकीय सेवा वेगळ्या पातळीवर कार्य करतात. परंतु 'एक आरोग्य' संकल्पनेनुसार मानव, प्राणी आणि पर्यावरण या तिन्ही घटकांचे आरोग्य एकत्रित विचारात घेतल्याशिवाय झूनोटिक रोगांना रोखता येणार नाही. उदा. दुधाळ प्राण्यांचे लसीकरण, कचरा व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याचे परीक्षण, शेतीतील रासायनिक वापर यांचे एकत्रित नियोजन केल्यास मानव आणि प्राण्यांच्या आरोग्यावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होऊ शकतो. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य विभाग, पशुवैद्यक तज्ञ, पर्यावरणतज्ज्ञ आणि समाजकार्यकर्ते यांचे एकात्मिक सहकार्य आवश्यक आहे.

'एक आरोग्य'चा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे मानसिक आरोग्य. आधुनिक जीवनशैली, प्रदूषण, नोकरीतील अस्थिरता, सामाजिक एकाकीपण आणि नैसर्गिक संसाधनांपासून तुटलेला मानवी संबंध हे सर्व मानसिक असंतुलनाचे कारण बनले आहे. संशोधन दर्शविते की निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या समाजांमध्ये मानसिक आरोग्य अधिक संतुलित असते. त्यामुळे समाजशास्त्रीय पातळीवर मानसिक आरोग्याचे आणि पर्यावरणाशी असलेल्या नात्याचे पुनर्संयोजन करणे आवश्यक आहे.

'एक आरोग्य दिन' आपल्याला शाश्वत विकास उद्दिष्टांची आठवण करून देतो. संयुक्त राष्ट्रांच्या २०३० टिकाऊ विकास कार्यक्रमात आरोग्य आणि कल्याण, स्वच्छ पाणी आणि स्वच्छता, हवामान कृती, आणि जमिनीवरील जीवन ही उद्दिष्टे 'एक आरोग्य'च्या तत्त्वांशी थेट जोडलेली आहेत. हे केवळ जागतिक ध्येय नसून प्रत्येक देश, राज्य, आणि गावाच्या स्तरावर अंमलात आणण्याजोगे मार्गदर्शक तत्त्व आहे. शालेय शिक्षणापासून ते आरोग्यसेवा, कृषी आणि उद्योग क्षेत्रापर्यंत या संकल्पनेचे सामाजिक आकलन झाल्यास 'आरोग्यपूर्ण समाज' निर्माण होऊ शकतो.



समाजशास्त्रीय विश्लेषणात 'एक आरोग्य' ही संकल्पना मानवाच्या वर्तनातील बदलाचे आवाहन करते. ती सांगते की आरोग्याचा प्रश्न फक्त वैयक्तिक जबाबदारीचा नाही, तर सामाजिक एकत्रिकतेचा आहे. आपल्या आहाराच्या सवयी, उपभोग संस्कृती, कचरा व्यवस्थापन, जलस्रोतांचे संरक्षण, जैवविविधतेचे जतन आणि प्राण्यांविषयी संवेदनशीलता या सर्व गोष्टी समाजाच्या आरोग्यदृष्टीला आकार देतात. म्हणूनच 'एक आरोग्य' ही एक चळवळ बनली पाहिजे, जी व्यक्तीच्या आरोग्यापलीकडे जाऊन पृथ्वीच्या आरोग्याचे संरक्षण करेल.

शेवटी, 'एक आरोग्य दिन' हा मानवतेच्या परस्परसंबंधांचा सण आहे. तो आपल्याला स्मरण करून देतो की माणूस निसर्गापासून वेगळा नाही. पृथ्वी, प्राणी, वनस्पती, हवा, पाणी आणि मानव हे सर्व एकाच जीवनसाखळीचे घटक आहेत. या साखळीतील कोणताही घटक दुर्लक्षित झाला, तर संपूर्ण आरोग्यव्यवस्था असंतुलित होते. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आरोग्याचा विचार करताना समता, न्याय, सहजीवन आणि पर्यावरणीय जबाबदारी हे मूलभूत तत्त्व ठरतात. 'एक आरोग्य' म्हणजे आरोग्याचा सर्वसमावेशक लोकशाही मार्ग होय. जिथे विज्ञान, समाज, निसर्ग आणि मानवता एकत्र येऊन शाश्वत जग निर्माण करतात.

०३ नोव्हेंबरचा 'एक आरोग्य दिन' साजरा करणे म्हणजे केवळ आरोग्याचा दिवस पाळणे नव्हे, तर मानवाने आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे. आपले आरोग्य, प्राण्यांचे आरोग्य आणि पर्यावरणाचे आरोग्य हे तिन्ही एका सूत्रात बांधलेले आहेत, या जाणिवेनेच खऱ्या अर्थाने एक आरोग्य साकार होईल. कारण शेवटी, मानवाचे आरोग्य पृथ्वीच्या आरोग्यापासून वेगळे नाही; ते दोन्ही एकाच अस्तित्वाच्या दोन बाजू आहेत.

– डॉ. राजेंद्र बगाटे,
(समाजशास्त्राचे अभ्यासक) मो. – ९९६०१०३५८२ ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

## चावे येथील वृद्ध महिलेची अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या; सामूहिक अत्याचाराचा स्थानिकांचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील चावे - भरे येथिल शेतावर गेलेल्या एका ६५ वर्षीय वृद्ध महिलेची अत्याचार करून नंतर दगडाने ठेचून हत्या केल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी समोर आली आहे.चावे भरे गावातील दुर्दैवी वृद्ध महिला दुपारी बारा वाजताच्या सुमारास आपल्या शेतावर गेली होती.त्यावेळी तिच्यावर शारीरिक अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या केल्याचा प्रकार कुटुंबियांना समजल्यानंतर कुटुंबीयांनी शेतावर धाव घेतली.त्यावेळेस वृद्ध महिलाही निपचित पडली होती.कुटुंबीयांनी ही बाब स्थानिक गणेशपुरी पोलिसांना कळविल्यानंतर गणेशपुरी पोलिस ठाण्यात पथक घटनास्थळी दाखल होत त्याने मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय या ठिकाणी घेऊन आले.

ही हत्या केल्यानंतर महिलेच्या गळ्या मध्ये असलेले सुमारे पाच ते सहा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने हे चोरीला गेले नसल्या मुळे ही हत्या चोरीच्या उद्देशाने नसून त्या महिले वर अत्याचार करून केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.हत्येच्या घटने नंतर त्या परिसरातून तीन जणांना पलायन करताना काही जणांनी पाहिल्याचे सांगितल्याची माहिती हत्या झालेल्या वृद्ध महिलेच्या मुलाने दिली असून,पोलिसांनी आरोपींना कठोर शिक्षा करावी अशी मागणी केली आहे. ही घटना समाजासाठी लज्जास्पद आहे. पोलिसांनी तत्काळ शारीरिक अत्याचार व हत्या केल्याचा गुन्हा दाखल करून आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते व भिवंडी वकील संघटनेचे अध्यक्ष अँड किरण चन्ने यांनी केला आहे.

या घटनेनंतर गणेशपुरी पोलिसांसह ठाणे ग्रामीणचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक अनमोल मित्तल,उपविभागीय अधिक्षक राहुल झालटे यांनी घटनास्थळा सह रुग्णालय तेथे भेट दिली असून या शारीरिक अत्याचार व हत्येचा गुन्हा गणेशपुरी पोलीस ठाण्यात नोंद करून गांभीर्याने तपास सुरू केला आहे.

## दत्ता गायकवाड लिखित चैतन्याचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : विविध प्रश्न सोडविण्यासाठी सक्सेस पासवर्ड म्हणजे जयभीम आहे. विचार करणारी नवी पिढी घडवली पाहिजे. त्यासाठी ग्रंथ वाचणे गरजेचे आहे. लेखक दत्ता गायवाड यांचे चैतन्याचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुस्तकातून बाबासाहेबांचा सोलापूरशी असलेला संबंध, इतिहास जगापुढे आला आहे. त्याचप्रमाणे बाबासाहेबांनी ज्या-ज्या गावात भेटी दिल्या, त्या प्रत्येक गावागावातील बाबासाहेब असे पुस्तक प्रकाशित व्हावे, असे प्रतिपादन संपादक संजय आवटे यांनी सोलापुरात केले.

ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड लिखित 'चैतन्याचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथाच्या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात थाटात झाले. या पुस्तकाचे प्रकाशन संपादक संजय आवटे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रा. एम. आर. कांबळे होते. विचारमंचावर लेखक दत्ता गायकवाड, अंबाजोगाई येथील प्रांताधिकारी दीपक वजाळे, सहाय्यक धर्मादाय आयुक्त संजय पाईकराव, निमंत्रक सुधीर चंदनशिवे आणि सुर्यमणी गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

संजय आवटे पुढे म्हणाले, दत्ता गायकवाड यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून ऐतिहासीक दस्तऐवजीकरण केले आहे. ते ही अगदी रंजकपणे, या पुस्तकाच्या आधारे चित्रपट देखील काढता येऊ शकतो. या स्थितीत आपण संशोधन करत, सप्रमाण महत्वाचा इतिहास लोकांसमोर घेऊन जायला हवा. आपल्यांना विचार करणारी पिढी घडवायची आहे. यासाठी नव्या पिढीने वाचायला हवे, आपण म्हणतो नवी पिढी त्यांना काही कळत नाही. पण, आपण त्यांना त्यांच्या पद्धतीने सांगत नाही. तुम्हाला बाबासाहेब नव्या पिढीला सांगायचे असतील तर त्यांच्या शैलीत सांगावे लागेल. चळवळीचे नेहमी दस्तऐवजीकरण करायला हवे. याचे महत्व इंग्रजांनी जाणले, म्हणू त्यांनी जगभर राज्य केले, असे प्रतिपादन आवटे यांनी केले. प्रांताधिकारी दीपक वजाळे म्हणाले, महाकाश्यप यांच्या कार्याचा वारसा दत्ता गायकवाड यांनी या पुस्तक रूपाने चालवला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्वाचे आहेत. ते सर्वांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे.




प्रास्ताविक सुधीर चंदनशिवे यांनी केले. अध्यक्षीय मनोगत प्रा. एम. आर. कांबळे यांनी व्यक्त केले. लेखक दत्ता गायकवाड यांनी तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनामागील पार्श्वभूमी उलगडली. सूत्रसंचालन डॉ. अंजना गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुजित हावळे यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## बळीराजाला सुखी, समाधानी ठेवण्याचे ...

(पान १ वरून..)

आपल्या राज्याने सर्व क्षेत्रात उत्कृष्ट काम करून प्रथम क्रमांकावर राहावे, विविध कल्याणकारी योजनाची प्रभावी अंमलबजावणी करून राज्याच्या विकासाची पताका सर्वत्र फडकावी यासाठी शासन कटिबद्ध आहे. त्याप्रमाणेच चंद्रभागा नदीसह सर्व नद्यांच्या प्रदूषण मुक्तीसाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. यावर्षीच्या कार्तिकी वारीमध्ये भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी अतिरिक्त पाच कोटींचा निधी तात्काळ उपलब्ध करून देण्यात आल्याचेही श्री. शिंदे यांनी सांगून राज्यातील सर्व भाविकांना कार्तिकी एकादशी निमित्त शुभेच्छा दिल्या तसेच मानाच्या वारकऱ्यांचे अभिनंदन केले व या यात्रा कालावधीत पालकमंत्री, जिल्हाधिकारी, स्थानिक आमदार व स्थानिक प्रशासन यांनी चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांच्या पत्नी सौ. लता एकनाथ शिंदे तसेच मानाचे वारकरी रामराव वालेगावकर व त्यांच्या पत्नी सौ. सुशिलाबाई रामराव वालेगावकर यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यात आली. यावर्षी प्रथमच कु. मानसी आनंद माळी व आर्य समाधान थोरात या दोन शालेय विद्यार्थ्यांची मानाचे वारकरी म्हणून निवड करण्यात आलेली होते. यावेळी उपमुख्यमंत्री व सर्व मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने तयार केलेल्या दैनंदिनी २०२६ चे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले तर आभार कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मानले.

## योग्य भूमी अभिलेखांसाठी सुलभ बदल नोंद प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची : मनोज जोशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : भारत सरकारच्या भूमी संसाधन विभाग , मसूरी येथील लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी आणि पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी (यशदा) यांच्या सहकार्याने, 'महसूल न्यायालयीन खटले व्यवस्थापन प्रणालींचे आधुनिकीकरण' या विषयावर ३१ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५ दरम्यान पुणे येथील यशदा येथे दोन दिवसीय राष्ट्रीय चिंतन शिबिराचे आयोजन केले आहे.

या शिबिराचे उद्घाटन आज (३१ ऑक्टोबर) रोजी भारत सरकारच्या भूमी संसाधन विभागाचे सचिव मनोज जोशी; महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव तसेच मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम; पुण्यातील यशदा'चे महासंचालक निरंजन के. सुधांसू; भारत सरकारच्या भूमी संसाधन विभागाचे सहसचिव कुणाल सत्यार्थी; कर्नाटक राज्याच्या महसूल विभागाचे प्रधान सचिव राजेंद्र कटारिया; आणि तेलंगणाचे अतिरिक्त मुख्य सचिव विनोद अग्रवाल यांच्या

**भूमी संसाधन विभागाकडून 'महसूल न्यायालयीन खटले व्यवस्थापन प्रणालींचे आधुनिकीकरण' या विषयावर राष्ट्रीय चिंतन शिबिराचे आयोजन**

उपस्थितीत करण्यात आले. देशभरातील इतर सर्व राज्यांचे प्रतिनिधी देखील या कार्यशाळेत सहभागी होत आहेत.

मनोज जोशी यांनी आपल्या प्रमुख भाषणात आधुनिक, पारदर्शक, कार्यक्षम आणि तंत्रज्ञान आधारित भूमी प्रशासनाचे आपले दृष्टिकोन मांडले. त्यांनी सुधारणा,




नवोन्मेष आणि नागरिक-केंद्रित महसूल प्रशासनाचे महत्त्व अधोरेखित केले. देशभरात जरी समान भूमी अभिलेख प्रणाली कार्यरत असली तरीही दुरुस्ती आणि बदल प्रक्रिया प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या पद्धतीने केली जाते, ज्यामुळे ती वेळखाऊ आणि गुंतागुंतीची बनते, असे त्यांनी नमूद केले. केंद्र सरकारने या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आधीच काही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत आणि या चिंतन शिबिराचे उद्दिष्ट या उपक्रमांवर संवाद सुलभ करण्यासाठी उच्च-स्तरीय व्यासपीठ म्हणून काम करणे, हे असल्याचे त्यांनी सांगितले.

मनोज जोशी यांनी महसूल न्यायालयीन प्रक्रिया सुलभ करणे, हक्कांच्या नोंदींचे मानकीकरण (ठेठ) करणे तसेच महसूल विषयक संज्ञांचा एकसंध शब्दकोश तयार करण्याचे महत्त्व देखील अधोरेखित केले. मालमत्ता बाजारातील व्यवहार सुलभ असणे हे भूमीच्या मूल्यात वाढ होण्यासाठी आवश्यक आहे. तसेच बदल नोंद प्रक्रिया सुरळीत असणे हे योग्य भूमी अभिलेखन साठी अत्यंत महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले. जोशी यांनी सर्व सहभागी प्रतिनिधींना देशभरातील भूमी प्रशासन प्रणालींची कार्यक्षमता सुधारण्यासाठी सूचना आणि कल्पना मांडण्याचे आवाहन केले.

कुणाल सत्यार्थी यांनी आधुनिक महसूल न्यायालयीन खटले व्यवस्थापन प्रणालीच्या उद्दिष्टांवर सविस्तर सादरीकरण केले, तसेच महसूल न्यायालयीन प्रकरणांमध्ये प्रक्रिया सुलभ करण्यासाठी काही उपाययोजनांची शिफारस केली. कुणाल सत्यार्थी यांनी विद्यमान प्रक्रिया मजबूत करण्यासाठी अनेक अंतर्दृष्टीपूर्ण उपाय देखील सुचवले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज






# पर्यावरण संवर्धनासाठी राज्याच्या शहरी भागामध्ये 'अर्बन फॉरेस्ट' तयार करणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## राज्यात एक लाख हेक्टर क्षेत्रामध्ये बांबू लागवड करण्याचे नियोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

- **राज्याच्या पर्यावरण पूरक विकासासाठी प्रदूषण मंडळाची महत्त्वपूर्ण भूमिका**
- **लोककलावंताच्या माध्यमातून राज्यभर नियमितपणे पर्यावरण जागृतीचे कार्यक्रम घ्यावेत**
- **उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते कार्तिकीची, वारी पंढरीच्या दारी या उपक्रमाचा समारोप**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वातावरणातील प्रदूषणाचे प्रमाण वाढल्याने वातावरणात अनेक अनिष्ट बदल होत आहेत. त्यामुळे नैसर्गिक आपत्ती सह प्रदूषणीय आपत्ती मध्ये वाढ होत आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून त्यासाठी वृक्ष लागवड व संवर्धन अत्यंत महत्त्वाचे आहे. नगर विकास विभागाच्या मार्फत राज्यातील सर्व महापालिका, नगरपरिषदा, नगरपालिका व नगरपंचायती मध्ये अर्बन फॉरेस्ट हा उपक्रम राबवण्यात येणार असून यात नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पंढरपूर येथील शासकीय विश्राम गृहाच्या परिसरात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण विभाग व महाराष्ट्र सांस्कृतिक कला मंच ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कार्तिकीची वारी पंढरीच्या दारी' या उपक्रमाच्या समारोपप्रसंगी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे, रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, गृह (शहरे), महसूल राज्यमंत्री योगेश कदम, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार समाधान आवताडे, आमदार तानाजी सावंत, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार शहाजी बापू पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सचिव एम. देवेंद्र सिंह यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री शिंदे पुढे म्हणाले की, ग्लोबल वार्मिंग, क्लायमेट चेंज मुळे मे महिन्यात, नोव्हेंबर मध्ये पाऊस पडणे तसेच पावसाळ्यात ढगफुटी होऊन अतिवृष्टी, पूर परिस्थितीमुळे बळीराजाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखणे अत्यंत गरजेचे असून त्यासाठी सर्व नागरिकांमध्ये वृक्ष लागवडीसाठी व पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती महत्वाची आहे. त्याप्रमाणेच ठाणे महापालिकेने चार ठिकाणी अर्बन फॉरेस्ट अंतर्गत मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केलेली आहे. तरी राज्यातील सर्व शहरांमध्ये स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून अर्बन फॉरेस्ट अंतर्गत वृक्ष लागवड करावी. त्याप्रमाणेच राज्यात बांबू लागवडीचे क्षेत्र किमान एक लाख हेक्टर पर्यंत वाढवावे, यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रयत्न करावेत. बांबू ही बहुपर्यायी तसेच पर्यावरण पूरक वृक्ष लागवड आहे असे त्यांनी सांगितले.

राज्यातील शेतकऱ्यावर अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे मोठे संकट आलेले आहे, शासन सर्व शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकरी कर्जमाफीसाठी शासनाने समिती गठीत केलेली आहे. या संकटाच्या काळात जी तातडीची मदत करावयाची होती ते शासन शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट जमा करत असल्याचेही माहिती उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी दिली. पर्यावरण समतोल राखण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून लहान मुलांमध्ये पर्यावरण जागृती करण्यासाठी त्यांना शालेय जीवनापासूनच वृक्ष संवर्धनाचे महत्त्व याबाबत जागृत केले पाहिजे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जनजागृती शिवाय दुसरा पर्याय नाही. तसेच आषाढी व कार्तिकी वारी पुरते पर्यावरण जागृतीचा संदेश देण्याशिवाय संपूर्ण वर्षभर सातत्याने असे उपक्रम राज्यभरात घेण्यासाठी प्रदूषण मंडळ व पर्यावरण विभागाने नियोजन करावे, यासाठी आवश्यक सर्व प्रकारचे सहाय्य करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील सर्व गड किल्ले ही खूप मोठी संपत्ती असून हे गड किल्ले स्वच्छ करण्याची मोहीम लवकरच रायगड किल्ल्यापासून करावी. प्रदूषण मंडळाने पर्यावरण समतोल तसेच जनजागृतीसाठी अद्यावत तंत्रज्ञान चा वापर करावा. सध्याचे कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत कुशल पद्धतीने करावा. पर्यावरण संवर्धनासाठी नैसर्गिक शेतीकडे वळले पाहिजे याबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी असेही आवाहन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. पर्यावरण पूरक विकासासाठी सर्वांनी सहभाग घ्यावा तसेच प्रत्येकाने राज्याच्या सर्वांगीण विकासाचे वारकरी व्हावे असेही आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी प्रदूषण मंडळाच्या माध्यमातून पर्यावरण पूरक असलेल्या बांबू लागवडीचा उपक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आल्याचे सांगून पर्यावरण संवर्धनासाठी संपूर्ण राज्यभरात जनजागृती मोहीम राबवली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी संस्कृती कला मंचच्या वतीने किर्तन, भारुड, गोंधळ व पोवाडा या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. कीर्तनकार प्रकाश खांडगे, मानसी बडवे, शैलजा खांडगे, योगेश चिकटगावकर, शाहीर प्रवीण जाधव यांचा सन्मान उपमुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री महोदय तसेच सर्व मान्यवरांनी टाळ मृदंगाच्या गजरात पावली केली. यावेळी उपमुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते कार्तिकीची वारी, पंढरीच्या दारी या पर्यावरण शिक्षण उपक्रमाचा समारोप झाला.

प्रदूषण मंडळाचे सदस्य सचिव एम.डी. सिंह यांनी प्रस्ताविक केले तर आभार संजय भुस्कुटे यांनी मानले.

# निफाड पोलीस ठाण्यात पोलीस अधीक्षक पाटील यांचे मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड पोलीस ठाण्यास पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीणचे बाळासाहेब पाटील यांनी भेट देऊन वार्षिक तपासणी केली, असून तालुक्यातील सर्व पोलीस पाटील व पोलीस कर्मचारी यांना विविध विषयावर मार्गदर्शन केले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संदर्भात करण्यात येणाऱ्या उपाययोजना व घ्यावयाची काळजी तसेच निफाड पोलीस ठाणे हद्दीतील गावकऱ्यांच्या अडीअडचणी व वाढत्या गुन्हेगारी यांना आळा घालण्यासाठी काय उपाययोजना करावी आदी विविध विषयांवर पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी मार्गदर्शन केले असून निफाड पोलीस स्टेशनच्या कामकाजाची पाहणी करून पोलीस अधीक्षक पाटील यांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी पोलीस उपविभागीय अधिकारी कांतीलाल पाटील निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनल पडोळ तसेच पीएसआय राजेंद्र बाविस्कर, विजय गायकवाड, विश्वनाथ निकम, पोलीस हवालदार ढेकळे, पवार, नितीन सांगळे, चव्हाणके, सानप, अरविंद ढवळे, विनोद जाधव, सागर जाधव, धनंजय बैरागी, स्वप्नील शिरसाट, विनोद वाघेरे, सिद्धार्थ वाघ, महिला पोलीस, हवालदार शिंदे, खुळे, मनीषा ठोक, ज्योती बैरागी, आदी पोलीस कर्मचारी व तालुक्यातील पोलीस पाटील याप्रसंगी उपस्थित होते.





# 'लक्षवेधी महिला सन्मान राष्ट्रीय पुरस्कार २०२५' ने अनिता कांबळे सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : आम्ही भारतीय महिला मंच, कोल्हापूर या नावाजलेल्या संस्थेचा 'लक्षवेधी महिला राष्ट्रीय सन्मान पुरस्कार -२०२५' सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्यासाठी अनिता कांबळे यांना देण्यात आला.शिव,शाहू, फुले, आंबेडकर, सावित्रीबाई, माता रमाई, अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावरती दिसून येतो. भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खडवली ता. कल्याण याठिकाणी त्या साहाय्यक शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.पहिले राज्यस्तरीय स्त्रीवादी साहित्य संमेलन, राजर्षी शाहू स्मारक भवन,कोल्हापूर येथे पार पडले त्याप्रसंगी संमेलनाध्यक्ष रंजनाताई सानप यांच्या हस्ते अनिता कांबळे यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याकार्यक्रमात स्मिताताई पानसरे, सुमनताई पुजारी, डॉ. शोभा चाळके आदी उपस्थित होते.'आम्ही भारतीय महिला मंच'च्या अध्यक्षा अँड. करुणाताई विमल आणि समन्वयक अंतिमा कोल्हापूरकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




# वीजबिलांच्या ग्राहक नावातील बदल अर्जांना आता स्वयंचलित मंजूरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दर्जेदार व तत्पर ग्राहकसेवेसाठी महावितरणने वीजबिलांच्या ग्राहक नावातील बदल करण्याच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी देण्यास सुरवात केली आहे. आवश्यक कागदपत्रे अपलोड करून प्रक्रिया शुल्काचा भरणा केल्यानंतर केवळ तीन ते सात दिवसांमध्ये वीजबिलावरील ग्राहक नावामध्ये बदलाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. यापूर्वी या प्रक्रियेस कृती मानकानुसार एक महिन्याचा कालावधी लागत होता.

राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांनी वीजग्राहकांना तत्पर व घरबसल्या सेवा देण्यासाठी महावितरणच्या डिजिटल सेवेत ग्राहकाभिमुख बदल करण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी बिलावरील ग्राहक नावात बदल करण्याच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी देण्याचा निर्णय घेतला.

### डिजिटल ग्राहकसेवेत महावितरणचे आणखी एक पाऊल पुढे

त्यासाठी नुकतीच ऑनलाइन प्रणाली विकसित व कार्यान्वित करण्यात आली आहे.

खरेदी-विक्री, वारसा हक्क किंवा इतर कारणांमुळे घर किंवा इतर मालमत्तेच्या मालकीमध्ये बदल झाल्यानंतर वीजबिलाच्या ग्राहक नावात बदल करण्यासाठी अर्ज करण्यात येतो. या प्रक्रियेसाठी महावितरण मोबाईल अॅप व ्.ारहरवळी-ले.ळप या संकेतस्थळावर वीजग्राहकांना 'लॉग-इन'द्वारे ऑनलाइन अर्ज सादर करणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे व प्रक्रिया शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. ग्राहकांचे अर्ज, छाननी व मंजूरी या प्रक्रियेसाठी मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या कृती मानकांप्रमाणे एक महिन्याचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. आता महावितरणकडून या अर्जांना स्वयंचलित मंजूरी मिळत असल्याने नावात बदल करण्याची कार्यवाही केवळ तीन ते सात दिवसांमध्ये पूर्ण होणार आहे. ग्राहक नावात बदल करण्याचा ऑनलाइन अर्ज व अपलोड केलेल्या कागदपत्रांची संबधित उपविभाग कार्यालयाकडून तपासणी होईल. त्यात काही त्रुटी आढळल्यास संबंधित ग्राहकांना लगेचच नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे कळविण्यात येईल. सोबतच ग्राहक नावात बदल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याचा संदेशही ग्राहकांना पाठविण्यात येईल. ग्राहक नावात बदल करण्याच्या अर्जांना स्वयंचलित मंजूरी मिळणार असल्याने प्रामुख्याने घरगुती ग्राहकांसह इतर ग्राहकांना महावितरणच्या डिजिटल सेवेचा तत्पर लाभ होणार आहे.

महावितरणने याआधी लघुदाब वर्गवारीतील सर्व औद्योगिक, व्यावसायिक, घरगुती व इतर ग्राहकांच्या १५७ केडब्लूपर्यंत वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजुरी देण्यास प्रारंभ केला आहे. त्याचा वीजग्राहकांना मोठा लाभ झाला आहे. गेल्या महिन्याभरात २४६० औद्योगिकसह ४ हजार १६४ वीजग्राहकांनी एका क्लिकवर वीज भारामध्ये तब्बल २२ हजार किलोवॅटने वाढ केली आहे. त्यानंतर आता वीजबिलांवरील ग्राहक नावात बदल करण्याची मंजूरी स्वयंचलित केल्याने डिजिटल ग्राहकसेवेत महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे.

# जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत एमआयटी ज्युनिअर कॉलेजचा संघ विजेता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर: क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे तथा सोलापूर जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सोलापूर येथे दिनांक २७ व २८ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल ज्युनिअर कॉलेजच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत विजेतेपद पटकावले आहे. तसेच एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या विजेत्या संघातील खेळाडू अनुष्का चाकूर, संजना बाड, श्रद्धा महाडिक, आर्या कुलकर्णी आणि ज्ञानेश्वरी फावडे यांची अहिल्यानगर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून त्या सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने प्रतिस्पर्धी संघाना कडवी झुंज देत तृतीय क्रमांक मिळवला. मुलांच्या या संघात पारस शेठ, पार्श्व देशमाने, कृष्णा जाधव, अथर्व चव्हाण व वेदांत सोनटक्के यांचा समावेश होता.

त्यातील पारस शेठ याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यावेळी क्रीडा अधिकारी दत्तात्रय वरकड व पंच हर्षद शेख उपस्थित होते. मुख्याध्यापिका शिबानी बॅनर्जी, प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ यांनी विजेत्या संघाचे व सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

### आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देत १० किमी मॅरेथॉन यशस्वीपणे पूर्ण

# पत्नी आणि मुलीसह धावले सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : शहरात रविवारी सकाळी आयोजित सोलापूर १०घ मॅरेथॉन स्पर्धेत सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी पत्नी आणि लहान मुलीसह सहभागी होऊन नागरिकांसमोर एक प्रेरणादायी उदाहरण ठेवले. त्यांनी कुटुंबासह १० किलोमीटर अंतर पूर्ण करून आरोग्य, कुटुंबातील एकता आणि फिटनेसचा सुंदर संदेश दिला.

मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या नागरिकांनी राजकुमार यांचा उत्साह आणि क्रीडाभाव पाहून कौतुकाची दाद दिली. पोलीस आयुक्तांनी धावतानाच नागरिकांना फिट राहा, निरोगी राहा असा संदेश दिला. त्यांच्या पत्नी आणि मुलीनेही उत्साहाने भाग घेत संपूर्ण वातावरण उत्साही बनवले.

या उपक्रमाद्वारे पोलीस आयुक्तांनी दाखवून दिले की प्रशासनातील अधिकारीदेखील समाजात आरोग्य आणि सकारात्मक जीवनशैलीबाबत आदर्श निर्माण करू शकतात. नागरिकांनी त्यांचे हे उदाहरण प्रेरणादायी असल्याचे सांगितले.



# संतांचे विचार आणि वारकरी परंपरा ही समाजाला ऊर्जा देणारी आहे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## शेगाव दुमाला येथे श्री संत ज्ञानेश्वर मोरे माऊली महाराज समाधी मंदिराचे उद्घाटन व भक्तनिवासाचे लोकार्पण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वारकऱ्यांची सेवा हीच खरी विठ्ठल सेवा आहे. आषाढी आणि कार्तिकी वारीत येणारा वारकरी हा आमचा प्रथम व्हीआयपी आहे. संतांचे विचार आणि वारकरी परंपरा ही समाजाला ऊर्जा देणारी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

शेगाव दुमाला येथे श्री संत ज्ञानेश्वर मोरे माऊली महाराज यांच्या समाधी मंदिराचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, महसूल राज्यमंत्री



योगेश कदम, माजी मंत्री तथा आमदार तानाजी सावंत, आमदार अभिजीत पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, संस्था प्रमुख दादा महाराज मोरे माऊली, स्वामी अमृता आश्रम महाराज, चकोर महास्वामी बाविस्कर, ह.भ.प. अक्षय भोसले महाराज, सरपंच सौ. जयलक्ष्मी माने व मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.

शासनाने मंदिरांच्या जतन व संवर्धनासाठी २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून, आषाढी दिंडी अनुदान, विमा योजना यांसारख्या अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे ज्याने गाईला गोमातेचा दर्जा दिला आहे. हे राज्य संतांची, वीरांची, शेतकऱ्यांची आणि कष्टकऱ्यांची भूमी आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले. तसेच श्री संत मोरे परिवाराच्या वारकरी परंपरेच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले म्हणाले की, हे सरकार शेतकरी आणि वारकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. संकटात असलेल्या जनतेच्या मदतीला तत्परतेने धावून जाण्याची आमची भूमिका आहे.

प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते श्री संत मोरे माऊली महाराज यांच्या समाधी मंदिराचे उद्घाटन तर भक्तनिवास क्र. १ चे लोकार्पण रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते झाले.

या उद्घाटन सोहळ्यामुळे शेगाव दुमाला गावात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले असून, वारकरी संप्रदायासाठी हे एक ऐतिहासिक पाऊल ठरले आहे.

## नामसंकीर्तन सभागृहासाठी २० कोटी निधीची मागणी: मा.आ. प्रशांत परिचारक यांनी घेतली उपमुख्यमंत्र्यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील एक सुंदर वास्तू असलेल्या पंढरपूर नामसंकीर्तन सभागृहाचे काम अंतिम टप्प्यात आले असून यासाठी वीस कोटी रुपये निधीची मागणी माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून केले आहे.

राज्यातील सर्वात मोठे तीर्थक्षेत्र असणाऱ्या पंढरपूर येथे विविध धार्मिक सामाजिक कार्यक्रम वर्षभर संपन्न होत असतात. सामाजिक कार्यक्रम वर्षभर संपन्न होत असतात यासाठी येथे भव्य नाम संकीर्तन सभागृह उभा करावी अशी मागणी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली होती त्याची दखल घेऊन सदर कामास मंजुरी देण्यात आली.

पंढरपूर शहरात नामस्म कीर्तन सभागृह महाराष्ट्र शासनाकडून मंजूर मिळाली होती सदर कामाची एकूण अंदाजे पत्रकीय किंमत रुपये ३९.४७ कोटी होती. आतापर्यंत २५ कोटी इतका निधी पंढरपूर नगरपरिषदेस प्राप्त झालेला आहे. प्राप्त झालेल्या निधीतून झालेल्या कामाची बिले देण्यात आलेली सध्याच्या कामाचा अंदाज पत्रकामध्ये वाढ झाली आहे. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील वॉल कंपाऊंड, प्लंबिंग, अग्निशमन व विद्युत इत्यादी कामे ७० टक्के काम पूर्ण झालेले आहे.

तिसरे टप्प्यातील नाम समकीरतन सभागृहाचे अंतर्गत रस्ते, भूखंड विकास अंतर्गत रस्ते, सुधारणा फर्निचर व्यवस्था विद्युत, सीसीटीव्ही कॅमेरे, सौर ऊर्जा कामे रोहित्र स्थलांतरण इत्यादी कामे करण्याचे असून यासाठी २० कोटी रुपये निधी मिळावा अशी मागणी प्रशांतराव परिचारक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची भेट घेऊन



केली असून याबाबतचे निवेदन ही दिले आहे.

## श्री निलेश देशमुख यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रीय सरातील रिजनल टीचर्स ऑर्गनायझेशन दापोली या संस्थेच्या २०२५ या वर्षाचा महाराष्ट्र राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार तांबवे टे. या. माढा श्री निलेश शशिकांत देशमुख यांना प्रदान करण्यात आला.



निलेश शशिकांत देशमुख यांच्या सामाजिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक, व प्रबोधनच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन रिजनल टीचर्स ऑर्गनायझेशन दापोली संस्थेच्या वतीने त्यांच्या यावर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

परंतु ते काही कारणास्तव पुणे येथील शिक्षक पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहू शकले नसल्याने रिजनल टीचर ऑर्गनायझेशन संस्थेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष संजय खटके रत्नागिरी जिल्हाध्यक्ष वर्षा खटके यांनी रविवारी कुर्डवाडी येथील त्यांच्या घरी निलेश देशमुख यांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात व त्यांची पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.

यावेळी बोलताना निलेश देशमुख यांनी रीजनल रिचार्ज ऑर्गनायझेशन या संस्थेचे स्वतःहून माझ्या कार्याची दखल घेऊन हा आदर्श पुरस्कार प्रदान केल्याबद्दल संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय काशीद राष्ट्रीय उपाध्यक्ष भारत पाटील राष्ट्रीय कार्याध्यक्ष संजय खटके, राष्ट्रीय सचिव शिक्षक निगम, जिल्हाध्यक्ष वर्षा खटके तसेच हेमंत कडबाने यांचे आभार मानले.

निलेश देशमुख हे उपक्रमातील पण तत्वे शिक्षक असून शिक्षक सहकार संघटनेचे सरचिटणीस मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष म्हणून ही शैक्षणिक सामाजिक, सांस्कृतिक, प्रबोधनाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत क्षेत्रात कार्यरत आहेत व त्यांना आदर्श पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे आमदार अभिजीत पाटील यांनी अभिनंदन केले.

## लामजना जिल्हा परीषद गटातुन शिवसेना (उ.बा.ठा) पक्षाकडुन मिराताई होळकर निवडणुक लढण्यास आग्रही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधि/अमर जाधव : आगामी स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीसाठी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने सक्षम पणे लामजना जिल्हा परीषद निवडणुक लढण्यासाठी मिरा तानाजी होळकर सक्षमपणे उमेदवार असुन शिवसेनेच्या वतीने निवडणुक लढण्यास आग्रही असल्याच लामजना गटात चर्चा असुन .हिंन्दुर्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा कडवट शिवसैनिक मनुन संताजी होळकर यांची ओळख असुन .लामजना स्थानीक च्या मिरा तानाजी होळकर उच्चशिक्षीत असुन लामजना गटातील लोकांची



सेवा करण्यासाठी जिल्हा परीषद निवडणुक लढवणार असल्याच प्रसारमाध्यमांना मिरा होळकर यांनी सांगीतले , संताजी होळकर हे गेल्या कित्येक वर्षापासुन शिवसेनेत शिवसैनिक मनुन काम करत आहेत .धाराशिव लोकसभा व औसा विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला लामजना सर्कल मधुन भरघौस लीड देत एकनिष्टा राखत कट्टर बाळासाहेबांचा शिवसैनिक मनुन संताजी होळकर यांची ओळख आहे ,तरी लामजना गटातुन शिवसेना (उ बा ठा ) पक्षाने मीरा तानाजी होळकर यांना जिल्हा परीषद उमेदवारी देण्यात यावी. यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे औसा तालुकाप्रमुख आबासाहेब पवार. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मा,तालुकाप्रमुख संजय उजळंबे, संत शिरोमनी मारुती महाराज साखर कारखाना संचालक विलास आबा काळे , संतोष सूर्यवंशी सुरेश भुरे, ज्ञानेश्वर चिल्ले, हरी शिंदे , सह सर्व शिवसैनिकाची मागणी आहे.

## मुंबईतील रक्ततुटवड्यावर टायगर ग्रुपच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : मुंबईमध्ये सध्या रक्ताचा तुटवडा जाणवत असताना,टायगर ग्रुप मुंबई प्रदेशच्या वतीने सामाजिक आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला आहे.टायगर ग्रुपचे राष्ट्रीय अध्यक्ष पै.डॉ.तानाजी भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त असल्फा येथील नालियावाला भानुशाली हॉल येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.अलीकडील काही दिवसांपासून मुंबईतील विविध रक्तपेढ्यांमध्ये रक्तसाठा कमी झाल्यामुळे रुग्णालयांना आवश्यक रक्तपुरवठा करण्यात अडचणी येत होत्या. अनेक रुग्णांना वेळेवर रक्त न मिळाल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती.या



पार्श्वभूमीवर प्रशासनाने विविध संस्था,सामाजिक संघटना आणि महाविद्यालयांना रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन केले होते.या सामाजिक आव्हानाला प्रतिसाद देत टायगर ग्रुपने पुढाकार घेत आदर्श उभारला आहे.या शिबिराचे आयोजन टायगर ग्रुप मुंबई अध्यक्ष संजय भाऊ खंडागळे आणि समाजसेविका छायाताई खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.तर घाटकोपर तालुका अध्यक्ष राहुल पवार आणि चांदिवली तालुका अध्यक्ष प्रशांत शर्मा यांच्या पुढाकाराने संपूर्ण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.शिबिरात शंभरहून अधिक रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत समाजाप्रती आपले कर्तव्य बजावले.अनेक नवयुवकांनी या उपक्रमात पहिल्यांदाच रक्तदान केले असून,टायगर ग्रुपने त्यांचा सन्मान करून अधिकाधिक युवकांना पुढे येण्याचे आवाहन केले.टायगर ग्रुपचे मुंबई अध्यक्ष संजय भाऊ खंडागळे म्हणाले,मुंबईत रक्ताचा तुटवडा हा गंभीर विषय बनला आहे. म्हणूनच आम्ही राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त इतर सामाजिक उपक्रमांसोबत हे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.प्रत्येक तरुणाने वर्षातून किमान दोनदा रक्तदान करावे – हेच खरे राष्ट्रसेवेचे कार्य आहे.

**सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त विशेष उपक्रम - सामाजिक संस्थांचा उत्स्फूर्त सहभाग**

## निफाड पोलीस ठाण्याच्यावतीने 'एकता दौड'चे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : राष्ट्रीय एकतेचे प्रतीक असलेले लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त निफाड पोलीस ठाण्याच्या वतीने 'एकता दौड' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ७.३० वाजता दौडची सुरुवात निफाड पोलीस ठाणे येथून उगाव रोडकडे करण्यात आली.

नाशिक ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने एकता दिन आणि पोलीस शहीद सप्ताह दिनानिमित्त पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील , विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, व.पोलीस उपअधीक्षक, उपविभाग निफाड चे . कांतीलाल पाटील. यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक गणेश गुरव तसेच निफाड नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे,यांचे प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते..यावेळी डॉक्टर असोसिएशन, स्विमिंग ग्रुप, सायकलिंग ग्रुप, पत्रकार संघटना, ग्रामपंचायत प्रतिनिधी, कृषी उत्पन्न बाजार समिती, व्यापारी वर्ग, शासकीय संस्था, शाळा-महाविद्यालये, सरकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी तसेच विविध सामाजिक व धार्मिक मंडळे यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते . उपस्थितांना यावेळी गुरव यांनी शपथ दिली.. उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे यांच्या हस्ते एकतेचा ध्वज उंचावून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली पोलीस ठाण्यापासून ते शिवडी रेल्वे गेट पर्यंत असे एकूण पाच किलोमीटर, स्पर्धक धावले प्रत्येक गटातील प्रथम पाच यशस्वी धावपटूंना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, ट्रॉफी ,देऊन गौरव करण्यात आला.

एकता दौड ही केवळ धावण्याची स्पर्धा नसून एकतेचा, देशप्रेमाचा आणि सामाजिक सहभागाचा संदेश देणारी प्रेरणादायी चळवळ असून. राष्ट्रीय एकतेचा संकल्प बळकट करावा. असा संदेश गणेश गुरव यांनी उपस्थितांना दिला, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निफाड पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सुधारित अनुदान योजनेसाठी १४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक बहुल शासन मान्यताप्राप्त खासगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सुधारित अनुदान योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या अटी व शर्तींची पूर्तता करून विहित नमुन्यातील अर्जासह संपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई शहर (जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१) येथे १४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

अर्जाचा नमुना https://mdd.maharashtra.gov.in यावर उपलब्ध आहे. निर्धारित दिनांकानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १४ नोव्हेंबर असून, जिल्हाधिकारी कार्यालयाने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून, त्रुटींची पूर्तता करून, अंतिम पात्र प्रस्ताव शासनास सादर करण्याचा अंतिम दिनांक - १५ डिसेंबर, २०२५ पर्यंत आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे अथवा दूरध्वनी: ०२२-२२६६०१६७, ई-मेल: dpomumbaicitygmail.com यावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.